दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड महाराष्ट्र | रविवार, 19 जुलै 2026 | अंक क्र. 74 | वर्ष 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# पुणे-संभाजीनगर प्रवास दोन तासांत; मुंबई-बेंगळुरू अंतर पाच तासांत

■ **पुणे : वृत्तसंस्था**

पुणे ते संभाजीनगर प्रवासाचा वेळ कमी करण्यासाठी नवीन उन्नत मार्ग उभारण्यात येणार असून, या प्रकल्पामुळे हे अंतर अवघ्या दोन तासांत पार करता येणार असल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. पुण्यात विविध रस्ते व पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या उद्घाटनप्रसंगी गडकरी बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून सुमारे ५० हजार कोटी रुपयांच्या कामांना लवकरच सुरुवात करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पुणे-संभाजीनगर मार्गावरील प्रस्तावित प्रकल्पामुळे पुण्याच्या वाढत्या वाहतूक समस्येवर उपाय मिळणार आहे. शिरूर ते संभाजीनगर या सुमारे १५ हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पामुळे पुणे-संभाजीनगर प्रवास दोन तासांत शक्य होईल. पुढे संभाजीनगर ते नागपूर प्रवास सुमारे पाच तासांत पूर्ण करता येणार आहे. हा मार्ग पुणे आणि नागपूरला जोडणारा महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गासाठी सुमारे १,२५० कोटी रुपयांचे काम सुरू असून, या मार्गाचे सुशोभीकरण ऐतिहासिक स्वरूपात करण्यात येणार असल्याचे गडकरी यांनी सांगितले.

दिल्ली-चेन्नई महामार्गावरील महाराष्ट्रातील भागात सुमारे ३२० किलोमीटर अंतर कमी होणार आहे. तसेच पुणे-मुंबई जुन्या महामार्गावरील अपघात कमी करण्यासाठी नवीन उपाययोजना राबवण्यात येणार आहेत. ठाणे-पुणे आणि तळेगाव-शिरूर मार्गासाठी सुमारे १० हजार कोटी रुपयांच्या कामांचे नियोजन करण्यात आले आहे. पुण्यात एका खांबावर दोन स्तरांवरील वाहतूक व्यवस्था उभारण्याची संकल्पना असून, खालच्या स्तरावर रस्ता आणि वरच्या स्तरावर मेट्रो अशी व्यवस्था प्रस्तावित आहे. मुंबई ते बेंगळुरू प्रवासाचा वेळ पाच तासांवर आणण्यासाठी १२० मीटर रुंदीचा नवीन द्रुतगती मार्ग प्रस्तावित करण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेला लवकरच वेग देण्यात येणार आहे. या सर्व प्रकल्पांमुळे महाराष्ट्रातील रस्ते वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होऊन उद्योग, व्यापार आणि प्रवासाला चालना मिळणार असल्याचे गडकरी यांनी स्पष्ट केले.





## २०३० पर्यंत पुणे आधुनिक शहर म्हणून ओळखले जाईल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ पुणे शहरातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि शहराच्या भविष्यातील विकासाला गती देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "या महत्त्वपूर्ण प्रकल्पांमुळे भविष्यात पुण्यातील वाहतुकीवरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. पुणे हे देशातील प्रमुख शैक्षणिक आणि औद्योगिक केंद्र म्हणून आधीपासूनच ओळखले जाते. मात्र, विकासाच्या नव्या पर्वामुळे २०३० पर्यंत पुण्याची ओळख देशातील एक आधुनिक आणि विकसित शहर म्हणून निर्माण होईल." पुण्यात वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी दुहेरी मार्गांची निर्मिती करण्यात येणार असून, या प्रकल्पात खालून रस्ता आणि वरून मेट्रो अशा दुहेरी सुविधेचे नियोजन करण्यात आले आहे. हडपसर ते उरुळी कांचनपर्यंत मेट्रो मार्ग प्रस्तावित असून, या मार्गामुळे सोलापूर रस्त्यावरील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे. दिवेघाटातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी येथे बोगदा (टनल) उभारण्यात येणार आहे. तसेच पुरंदर विमानतळासाठी आवश्यक जमीन संपादनाची प्रक्रिया वेगाने सुरू असून, आतापर्यंत सुमारे ५० टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित प्रक्रिया ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. मुख्यमंत्री म्हणाले की, या सर्व प्रकल्पांसाठी आवश्यक निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात येत असून, पुढील तीन वर्षांत हे प्रकल्प कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

# 22 ते 26 जुलैदरम्यान परळी तालुका भाजपाचे सामाजिक उपक्रम

## देवेंद्र फडणवीस आणि पंकजा मुंडे यांचा वाढदिवस समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा होणार




■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी):



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त 22 ते 26 जुलै या कालावधीत सेवा, संस्कार आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत परळी तालुक्यात भाजपाचे पाच दिवसीय सामाजिक अभियान.

यामध्ये "एक पेड पंकजाताई के नाम" हा विशेष उपक्रम तालुक्यातील प्रत्येक गावात राबविण्यात येणार असल्याची माहिती भाजपा तालुका अध्यक्ष राजेश गित्ते यांनी दिली. या पाच दिवसांच्या उपक्रमांत रक्तदान शिबीर, पंचम ज्योतिर्लिंग वैद्यनाथ मंदिरात अभिषेक, वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम, निराधारांना अन्नदान, शैक्षणिक साहित्य वाटप तसेच वारकऱ्यांसाठी अन्नदान अशा विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. "वाढदिवस हा केवळ शुभेच्छांचा दिवस न राहता समाजासाठी काहीतरी सकारात्मक करण्याची संधी आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याने आणि नागरिकांनी या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे," असे आवाहन भाजपा तालुका अध्यक्ष राजेश गित्ते तसेच तालुक्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# बारावीनंतरच पदवीसोबत यूपीएससी-एमपीएससीची तयारी

## 'एमआयटी-एडीटी'चा अभिनव उपक्रम; प्रशासकीय अधिकारी होण्याचा मार्ग अधिक सुकर

■ **लातूर प्रतिनिधी**

केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी), बँकिंग, कर्मचारी निवड आयोग (एसएससी) तसेच अन्य स्पर्धा परीक्षांसाठी दरवर्षी लाखो विद्यार्थी प्रयत्न करतात. मात्र, पदवी पूर्ण झाल्यानंतर स्वतंत्रपणे स्पर्धा परीक्षांची तयारी करताना वेळ आणि आर्थिक खर्च मोठ्या प्रमाणात वाढतो. ही गरज लक्षात घेऊन एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी (एमआयटी-एडीटी) विद्यापीठाच्या एमआयटी स्कूल ऑफ इंडियन सिव्हिल सर्व्हिसेसने (एसआयसीएस) बारावीनंतरच पदवी शिक्षणासोबत यूपीएससी, एमपीएससी, बँकिंग आणि इतर स्पर्धा परीक्षांची एकात्मिक तयारी करून देणारा बी.ए. (अॅडमिनिस्ट्रेशन) हा अभिनव अभ्यासक्रम सुरू केला आहे, अशी माहिती स्कूलचे प्राध्यापक डॉ. अरूण तुपे यांनी दिली.

याप्रसंगी, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी प्रा.चंद्रकांत बोरुडे, लातूरच्या एमआयटी शैक्षणिक संकुलाचे जनसंपर्क अधिकारी श्रीधर घुले आदी उपस्थित होते.

डॉ. तुपे म्हणाले की, स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असलेले विषय पदवी शिक्षणासोबतच शिकता यावेत, यासाठी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली या अभ्यासक्रमाचा आराखडा यूपीएससी, एमपीएससी आणि बँकिंग स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासक्रमाशी सुसंगत ठेवण्यात आला आहे. त्यामुळे पदवी पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षांची भक्कम तयारी होण्यास मदत होते.

या अभ्यासक्रमात भारतीय राज्यघटना, सार्वजनिक प्रशासन, इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, राज्यव्यवस्था, आंतरराष्ट्रीय संबंध व भू-राजकारण, सुशासन, सार्वजनिक धोरण, सार्वजनिक वित्त, भारतीय व जागतिक अर्थव्यवस्था, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सुरक्षा, परराष्ट्र धोरण, शाश्वत विकास, डिजिटल प्रशासन, कृत्रिम बुद्धिमत्ता व उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा प्रशासनावरील प्रभाव, पर्यावरणीय धोरणे, चालू घडामोडी, विश्लेषणात्मक विचार, तार्किक क्षमता, संवाद कौशल्य, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता, व्यक्तिमत्त्व विकास, उत्तरलेखन आणि मुलाखत कौशल्य यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पदवी अभ्यासक्रमासोबतच स्पर्धा परीक्षांची तयारी एकाच शैक्षणिक चौकटीत करता येणार असून, स्वतंत्र वेळ आणि अतिरिक्त खर्चाची गरज मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. स्पर्धा परीक्षांसोबतच विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेवरही या अभ्यासक्रमात भर देण्यात आला आहे. शासन, सार्वजनिक क्षेत्र, बँकिंग, प्रशासन, धोरण विश्लेषण तसेच विविध स्पर्धात्मक करिअर क्षेत्रांसाठी आवश्यक कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित करण्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

> "यूपीएससी, एमपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षांतून कौशल्याधिष्ठित, मूल्याधिष्ठित आणि सामाजिक जाण असलेले अधिकारी प्रशासनात यावेत, तसेच राष्ट्रउभारणीत त्यांचे मोलाचे योगदान असावे, हा आमचा उद्देश आहे. एमआयटी स्कूल ऑफ इंडियन सिव्हिल सर्व्हिसेसच्या माध्यमातून अशाच सक्षम, संवेदनशील आणि कर्तृत्ववान भावी अधिकाऱ्यांची जडणघडण होणार आहे."
>
> **– प्रा. डॉ. मंगेश कराड**
> कार्याध्यक्ष तथा प्र.कुलपती,
> एमआयटी-एडीटी विद्यापीठ, लोणी-काळभोर, पुणे



MIT-ADT UNIVERSITY
PUNE, INDIA
A Leap Towards World Class Education

## तज्ज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन, नियमित टेस्ट सिरीज

■ एमआयटी एसआयसीएसमध्ये विद्यार्थ्यांना तज्ज्ञ प्राध्यापकांचे (प्रोफेसर इन प्रॅक्टिस) मार्गदर्शन, नियमित टेस्ट सिरीज, उत्तरलेखनाचा सराव, मुलाखत प्रशिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास आणि करिअर मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. पदवी शिक्षणासोबतच स्पर्धा परीक्षांची नियोजनबद्ध तयारी केल्यास वेळ, खर्च आणि प्रयत्नांची बचत होऊन यशाची शक्यता अधिक वाढते. याच उद्देशाने एमआयटी-एडीटी विद्यापीठाने शिक्षण आणि स्पर्धा परीक्षा तयारीचा प्रभावी संगम घडवून आणणारा हा अभ्यासक्रम विकसित केला असल्याचे प्रा.चंद्रकांत बोरुडे यांनी सांगितले.



# संपादकीय

## बैलाविना शेतीला मजा नाही!

रासायनिक खतांने पर्यावरणाचे जे नुकसान होत आहे, ते पाहता पुन्हा एकदा बैलांच्या शेतीकडे वळण्याची गरज अधोरेखित होत आहे. सेंद्रिय शेतीचा पाया बैलांच्या सान्निध्यात टिकून राहणाऱ्या नैसर्गिक चक्रावर अवलंबून आहे.

कष्टाशिवाय मातीला आणि बैलाशिवाय शेतीला पर्याय नाही या लोकप्रिय सुवचनेप्रमाणे मातीशी जोडलेला आणि बैलाच्या कष्टावर आधारित असलेला शेतीचा पाया कधीही बदलू शकत नाही. त्यामुळे बैलाविना शेतीला मजा नाही हे अगदी खरे आहे. शेती आणि बैल यांचे नाते अतूट आहे. सध्या सर्रास ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेती केली जात आहे; परंतु बैलांच्या सहाय्याने शेती केली जात होती त्यामध्ये खरी मजा असायची. शेतात मशागत करून चालणार नाही तर प्रत्यक्षात शेतात घाम गाळावा लागतो. शेतातील मातीशी एकरूप व्हायचे असेल तर बैलांच्या सहाय्याने नांगरणी केल्याने खऱ्या अर्थाने मातीशी एकरूप होता येते. यातूनच कष्टाचे महत्त्व समजते. त्यामुळे ट्रॅक्टरने शेती जरी केली तरी आजही आणि उद्या शेतीशी बैलांचे योगदान अबाधित राहणार आहे. हीच खरी आपल्या शेतीप्रधान देशातील शेतीची संस्कृती आहे. थंडी, ऊन आणि पाऊस यांची पर्वा न करता शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून कष्टाची कामे करीत असतात. त्यामुळे बैल हा शेतकऱ्यांचा कष्टाचा साथीदार झाला आहे. आतापर्यंत बैलांच्या सहाय्याने शेतातील नांगरणी, कोळपणी, गुटा, मळणी आणि बैलगाडीने सामानाची वाहतूक करणे अशी विविध अवघड कष्टाची कामे केली जात होती. काही ठिकाणी अजूनही केली जातात. मात्र त्याचे प्रमाण कमी होत आहे. म्हणजे त्यावेळी शेतकऱ्यांचा खरा आधार बैल होता.

शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानामुळे बैलांची जागा ट्रॅक्टरने घेतली तरी बैलांची जागा कोणीही घेऊ शकत नाही. शेवटी बैल हे बैल असतात. शेतीचा विचार करता शेताच्या मातीशी जुळलेली त्यांची नाळ आणि शेतकरी राजाचे भावनिक नाते कमी झालेले नाही. शेतकऱ्यांच्या कुटुंबातील एक प्रमुख घटक असतो. बैल हे शेतीपुरते मर्यादित नसून बैलांमुळे ग्रामीण भागातील जीवनमान उंचावण्यास मदत झालेली आहे. त्यामुळे शेताच्या बांधावर गेल्यावर बैलांची आठवण येते. आपल्या राज्यात शेती क्षेत्रात बैलांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, उद्याही असणार आहे. शेतकरी बैलांच्या मदतीने शेतात काम करीत असताना माती आणि निसर्गाशी जिव्हाळा लागलेला आहे. नैसर्गिक संकटे आली तरी त्यांच्यामध्ये तडा गेलेला नाही किंवा जाणारही नाही. हा निसर्गाचा नियम आहे. शेतीची कामे झाल्यावर कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शेतकरी बैलांचे पूजन करतात. तसे दरवर्षी बैलपोळा सण शेतकऱ्यांच्या वतीने उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी बैलांना पाण्याने धुतले जाते. त्यानंतर त्यांचे अंग टॉवेलने पुसले जाते. त्यांच्या शिंगांना शेतकरी आपल्या आवडीप्रमाणे रंग लावतात. गळ्यात रंगीबेरंगी फुलांची माळ घालण्यात येते. घरात गोडधोड जेवण केले जाते. गोठ्यात जाऊन त्यांच्या डोक्याला टिळा लावून त्यानंतर आरती ओवाळून त्यांचे पूजन केले जाते. पूजन झाल्यावर केळीच्या पानातून त्यांना सुद्धा जेवण दिले जाते. त्या दिवशी त्यांना गोठ्यातच आराम करण्यासाठी दाव्याने बांधून ठेवतात. वेळच्या वेळी चारा आणि पाणी दिले जाते. म्हणजे याचा अर्थ असा होतो की, आपल्यापेक्षा मुक्या प्राण्यांना अधिक समजते. शेवटी काय मौनाची भाषा मौनालाच समजते.

शेतीच्या कामासाठी बैलांचा वापर केला गेल्याने जमिनीची नांगरणी करीत असताना जमिनीची धूप कमी होते. त्यांच्या पायांनी माती बारीक होते. चिखलही शेतीलायक होतो. शेणाचा उपयोगही सेंद्रिय खत म्हणून वापर केला जातो. यामुळे जमिनीची सुपीकता दीर्घकाळ टिकून राहते तसेच प्रदूषण कमी होण्याला मदत होते. शेती उत्पादनाचा विचार करता पारंपरिक पद्धतीने शेती करत असल्याने आधुनिक पद्धतीपेक्षा कमी उत्पादन होऊ शकते. मात्र शेतीचा कस टिकून राहतो. जरी शेती उत्पादन कमी झाले तरी बैलांमुळे आपण पर्यावरणपूरक शेती करू शकतो. यात मानवी श्रमाचा वापर केला जात असून नैसर्गिक बी-बियाण्यांचा अर्थात स्थानिक बियाण्यांचा व शेण खताचा वापर केला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांचे हात-पाय सुद्धा सुरक्षित राहतात.

आता शेतीची कामे सुरू झालेली आहेत. शेतकरी जमिनीची नांगरणी ट्रॅक्टरने करू लागले आहेत. त्यामुळे शेतात शेतकऱ्यांचा आवाज एकदम बंद असल्याचा दिसतो. जेव्हा बैलांच्या सहाय्याने नांगरणी करीत होते तेव्हा जमीन नांगरताना शेतकरी ईरीरी..., पापारी... म्हणत असत. शेतकऱ्याच्या एका हातात रुमनी आणि एका हातात लिंगडीची काटी असायची. बैलांची नावे पण आकर्षक ठेवायची पाखऱ्या, पांढऱ्या, हौश्या, हरण्या, सोन्या, लाल्या अशी असायची. शेतकरी बैलाचे नाव घेऊन म्यार धर म्हटले की, तो आपोआप मेरे जवळ जायचा. त्यामुळे नांगरणी सुद्धा शेतीलायक व्हायची. कोपऱ्यात बैल उभे असले काय कोपरे फुलून दिसायचे. हीच खरी शेतकऱ्यांची शान आहे. आता जरी ट्रॅक्टरने शेती केली तरी बैलांशिवाय शेतीची कामे केली अशी वाटत नाहीत. तसेच बैलांच्या सहाय्याने नांगरणी केली जात होती त्यावेळी शेतकरी राजाला त्यात खरा आनंद मिळत होता. त्यामुळे बैलाविना शेतीला मजा नाही हे मात्र खरे आहे. आजचे कृषी जग हे यांत्रिकीकरणाच्या प्रभावाखाली असले तरी, बैलांच्या परंपरेत जपलेले ते सौंदर्य आणि तो जिव्हाळा यांत्रिक ट्रॅक्टरमध्ये कधीही सापडणार नाही. आधुनिकतेच्या रेट्यात आपण कदाचित वेगवान शेती करत असू, परंतु त्या वेगाच्या नादात आपण मातीचा पोत आणि बैलांशी असलेला भावनिक संवाद हरवून बसलो आहोत का, असा प्रश्न पडतो.

लोकार्थ

## सोटेफिन भारतचा आयपीओ विक्रीसाठी खुला

रोबोटिक आणि ऑटोमेटेड पार्किंग सोल्यूशन्ससाठी 'टर्नकी' (पूर्ण सेवा देणारी) प्रदाता कंपनी असलेल्या सोटेफिन भारत लिमिटेडने आपला 'इनिशिअल पब्लिक ऑफरिंग' गुरुवार, १६ जुलै २०२६ रोजी खुला करण्याचे प्रस्तावित केले आहे. याद्वारे कंपनी ₹८९.७६ कोटी (उच्च किंमत पट्ट्यानुसार) उभारण्याचे उद्दिष्ट ठेवत असून, हे शेअर्स बीएसइ एस एम इ प्लॅटफॉर्मवर सूचीबद्ध केले जातील.या इश्यूचा आकार ४८,००,००० पर्यंत इक्विटी शेअर्सचा असून, त्यांचे दर्शनी मूल्य प्रत्येकी ₹१० आहे आणि किंमत पट्टा प्रति शेअर ₹ १७८ - ₹१८७ असा निश्चित करण्यात आला आहे.IPO मधून मिळणारी निव्वळ रक्कम खालील बाबींसाठी वापरली जाईल: पश्चिम बंगालमधील कोलकाता येथे उत्पादन प्रकल्प उभारण्यासाठी भांडवली खर्चाची पूर्तता करणे, प्रस्तावित नवीन कार्यालयीन जागेसाठी भांडवली खर्चाची पूर्तता करणे, कंपनीच्या खेळत्या भांडवलाच्या गरजा पूर्ण करणे आणि सामान्य कॉर्पोरेट उद्देशांसाठी वापर करणे. अँकर बिडिंग बुधवार, १५ जुलै २०२६ रोजी खुला झाला असून. हा इश्यू गुरुवार, १६ जुलै २०२६ रोजी विक्रीसाठी खुला झाला असून आणि सोमवार, २० जुलै २०२६ रोजी बंद होईल.या इश्यूसाठी चोइस क्यापिटल आडव्हाय्झार हे 'बुक रनिंग लीड मॅनेजर' आहेत आणि बिग शेअर सर्विस हे 'रजिस्ट्रार' आहेत.







## योग्य टर्म इन्शुरन्स कव्हर करण्यासाठी १०x नियमाच्या पलीकडे: रणजित मिश्रा, इव्हीपी कोटक लाईफ इन्शुरन्स

योग्य टर्म इन्शुरन्स कव्हर ठरवण्यासाठी वार्षिक उत्पन्नाच्या १० ते १५ पट हा एक सामान्य नियम मानला जातो. पण, ह्युमन लाईफ व्हॅल्यू ही पद्धत त्यापेक्षा जास्त प्रभावी आहे. ही पद्धत कुटुंबातील कमावत्या व्यक्तीच्या आर्थिक मूल्यावर लक्ष केंद्रित करते. भविष्यात त्यांच्या आर्थिक मदतीची जागा घेण्यासाठी किती उत्पन्नाची गरज लागेल, हे यातून कळतं.

व्यवहारात सांगायचं तर, तुमची सध्याची कमाई, कुटुंबाचा खर्च, जुनी देणी, मुलांचं शिक्षण यांसारखी ध्येय आणि कुटुंबाला किती वर्षं पैशांची गरज आहे, याचा विचार करणं गरजेचं आहे. फक्त मोठी रक्कम मिळवणं हा उद्देश नसून, कुटुंबाला आपली जीवनशैली आणि ध्येय टिकवता यावीत, हे महत्त्वाचं आहे. लाईफ कव्हरची रक्कम अशी हवी की, ज्यामुळे कमावत्या व्यक्तीच्या दैनंदिन खर्चाची कमतरता भरून निघेल. सोबतच, कर्जाचा भार कुटुंबावर पडणार नाही आणि भविष्यातील महत्त्वाची स्वप्नं पूर्ण होतील, याचीही काळजी घेता येईल.कुटुंबाला, विशेषतः लहान मुलं किंवा कमावती नसलेली माणसं असतील तर, किती काळ आर्थिक मदतीची गरज आहे, याचा विचार व्हायला हवा. महागाई हा सुद्धा महत्त्वाचा भाग आहे, कारण आरोग्य, शिक्षण आणि घरखर्च भविष्यात वाढणारच आहेत. एक योग्य विमा रक्कम कुटुंबाच्या तातडीच्या गरजा भागवून त्यांना आपली ध्येय गाठण्यासाठी आत्मविश्वास देऊ शकते.

## कॅलिबर लॉजिस्टिक्सची गुंतवणूकदारांकडून १३४.९९ कोटीची उभारणी

कॅलिबर मायनिंग अँड लॉजिस्टिक्स लिमिटेड, जी एकात्मिक ओव्हरबर्डन रिमूव्हल, कोळसा उत्खनन आणि कोळसा लॉजिस्टिक्स सेवा पुरवणारी एक मायनिंग ऑपरेटर कंपनी आहे, तिने शुक्रवार, १७ जुलै, २०२६ रोजी सार्वजनिक वर्गणीसाठी खुल्या होणाऱ्या आपल्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरिंग (आयपीओ) पूर्वी अँकर गुंतवणूकदारांकडून १३४.९९ कोटी रुपये जमा केले आहेत.कंपनीने शेअर बाजारांना कळवले आहे की, त्यांनी अँकर गुंतवणूकदारांना प्रति शेअर ४२४ रुपये दराने ३१,८३,९६१ इक्विटी शेअर्सचे वाटप केले आहे.या अँकरमध्ये सहभागी झालेल्या काही प्रमुख संस्थांमध्ये अशोका इंडिया इक्विटी इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट पीएलसी, कार्नेलियन इंडिया अमृतकाळ फंड आणि अबक्कस फोर२एट ऑपर्च्युनिटीज फंड यांचा समावेश आहे.इक्विटी-आधारित योजनांमध्ये, कंपनीने क्वांट म्युच्युअल फंड आणि हेलिओस स्मॉल कॅप फंडाला शेअर्सचे वाटप केले आहे.

बातमी -४]महाराष्ट्राचा 'स्किल फर्स्ट' पॅटर्न

जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधून कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागातर्फे एल्फिन्स्टन टेक्निकल हायस्कूल, फोर्ट येथील सेंट्रल हॉलमध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी राज्यातील कौशल्य विकासाला अधिक बळकटी देणाऱ्या विविध महत्त्वपूर्ण उपक्रमांचा शुभारंभ करण्यात आला. वर्ल्ड बँकच्या साहाय्याने, दक्ष प्रकल्पाअंतर्गत निदेशक प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी प्रशिक्षक प्रशिक्षण उपक्रमाचे ऑनलाइन उद्घाटन करण्यात



आले. पहिल्या टप्प्यात २४० प्रशिक्षकांना आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण देण्यात येणार असून, त्यामध्ये ॲडव्हान्स मॅन्युफॅक्चरिंग, इलेक्ट्रिक व्हेईकल, मशीनिंग, रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग, प्लंबर, सर्व्हेअर, , वेल्डर, एरोनॉटिकल स्ट्रक्चर अँड इक्विपमेंट फिटर आदी अभ्यासक्रमांचा समावेश आहे. महिंद्रा अँड महिंद्रा, लार्सन अँड टुब्रो या सारख्या उद्योगांनी सदर प्रशिक्षणाच्या सहकार्यसाठी पुढाकार घेतला आहे, आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आवश्यक कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी सह्याद्री रुरल डेव्हलपमेंट फाउंडेशन, नाशिक यांना ४,००० उमेदवारांच्या पूर्वकौशल्य ज्ञान प्रमाणीकरण पत्र प्रदान करण्यात आले

■ **संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे**

## गर्दीचा फायदा घेत बसस्थानकात ६० हजारांचा ऐवज लंपास; महिलेची पर्स फोडून चोरट्याचा हातसफाई

परळी वैजनाथ | प्रतिनिधी

परळी वैजनाथ बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने एका महिलेच्या पर्सला ब्लेडने कापून त्यामधील सुमारे ६० हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी संभाजीनगर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, परभणी जिल्ह्यातील गंगाखेड येथील रहिवासी नवधसिन शदिक पठाण या आपल्या कुटुंबासह वास्तव्यास असून मजुरी करून उदरनिर्वाह करतात. त्या ११ जुलै रोजी दुपारी गंगाखेडला जाण्यासाठी परळी वैजनाथ बसस्थानकावर आल्या होत्या. गंगाखेडकडे जाणारी बस आल्यानंतर त्या बसमध्ये चढत असताना मोठी गर्दी झाली. याच वेळी त्यांच्या मुलालाही गर्दीत धक्का लागल्याने त्या काही क्षण बसपासून दूर झाल्या. नंतर दुसऱ्या बसची वाट पाहत असताना त्यांनी पर्स तपासली असता पर्स एका बाजूने कापलेली दिसली. पर्स उघडून पाहिल्यानंतर त्यामधील सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरीला गेल्याचे त्यांच्या लक्षात आले.

चोरीस गेलेल्या मुद्देमालामध्ये २.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे पत्ता मनी (अंदाजे किंमत १५ हजार रुपये), ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे टॉप्स (१८ हजार रुपये), ११ चांदीच्या अंगठ्या (२ हजार रुपये) तसेच २५ हजार रुपये रोख असा एकूण ६० हजार रुपयांचा ऐवज असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

घटनेनंतर महिलेने संभाजीनगर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार भाऊसाहेब वेंकटराव सौदणकर करीत आहेत.

दरम्यान, परळी बसस्थानक परिसरात प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेत पाकिटमारी व पर्स चोरीच्या घटना अधूनमधून घडत असल्याने प्रवाशांनी आपल्या मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी, तसेच बसमध्ये चढताना आणि उतरताना विशेष सतर्क राहावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.





## कृषी खात्यामधील निविष्ठा खरेदीच्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी एसआयटी नेमून तुकाराम मुंढे यांचे नियुक्ती करावी : वसंत मुंडे



■ **परळी (प्रतिनिधी)**

महाराष्ट्रातील कृषी खात्यामध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानातील कोट्यवधीचा गैरव्यवहार झाला असून सन २०१७ च्या शासन निर्णयातील सरकारी संस्थेने उत्पादित केलेल्या निविष्ठा खरेदी करणे त्या वाक्याचा गैरफायदा घेऊन कृषी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संगणमत करून भ्रष्टाचार केल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. निविष्ठा उत्पादित करत नसलेल्या एमआयडीसी व कृषी विज्ञान केंद्र यांच्याकडून ४०टक्के कमिशन घेऊन शेतकऱ्याच्या माथी निकृष्ट निविष्ठा वाटप करत असल्याने शेकडो कोटीचे निविष्ठा दरवर्षी वेगवेगळ्या योजनेतून खरेदी करून कृषी विभागात भ्रष्टाचार करणारी टोळी मंत्रालयापासून जिल्हा पातळी पर्यंत कार्यरत असल्याचा गंभीर आरोप वसंत मुंडे यांनी केला . मंत्रालय व प्रशासन शेतकरी आत्महत्यास जबाबदार आहे. ३०२ कलमा खाली विस्तार व आत्मा संचालक, एमडी, एमआयडीसी यांच्यावर गुन्हे दाखल करावेत. कृषी खात्यातील संपूर्ण भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एसआयटी नेमून तुकाराम मुंढे यांची नियुक्ती करावी व शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी शासनाकडे काँग्रेस नेते वसंत मुंडे यांनी केली .



दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# लोककल्याणकारी सेवा पंधरवड्यानिमित्त नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांच्या हस्ते डॉ.भालचंद्र सार्वजनिक वाचनालयास ग्रंथभेट

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

लोककल्याणकारी सेवा पंधरवड्यानिमित्त नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांच्या हस्ते डॉ.भालचंद्र सार्वजनिक वाचनालयास ग्रंथभेट देण्यात आले.

नगर परिषद परळी वैजनाथच्या वतीने माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे आणि पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त १५ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत "लोककल्याणकारी सेवा पंधरवडा"राबविण्यात येत आहे.या उपक्रमांतर्गत शनिवार, दि. १८ जुलै रोजी नगर परिषद अंतर्गत डॉ. भालचंद्र सार्वजनिक वाचनालय येथे ग्रंथदान अभियानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्षा खैसर राजा खान पठाण, मुख्याधिकारी पी. एस. निगळ, सर्व सभापती तसेच नगर परिषद परळी वैजनाथचे सर्व नगरसेवक व नगरसेविका यांच्या वतीने वाचनालयासाठी विविध विषयांवरील ग्रंथ भेट






देण्यात आले. या उपक्रमामुळे वाचनालयाचा ग्रंथसंग्रह अधिक समृद्ध होणार असून विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा देणारे युवक आणि सर्वसामान्य वाचकांना त्याचा लाभ होणार आहे. या प्रसंगी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, सभापती योगेश मेनकुदळे, नगरसेवक अनंत इंगळे, नगरसेवक अश्विन आघाव, उत्तम मोरे, पत्रकार धिरज जगले, बाळासाहेब फड आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच वाचनालयाचे ग्रंथपाल गंगाधर जगतकर, शंकर साळवे, बंडू जाधव, भगवान काकडे, वजीर खान, महादेव गित्ते, मयूर ताटे, उर्मिला पवार, सविता बारड आदींची उपस्थिती होती. लोककल्याणकारी सेवा पंधरवड्याच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक आणि जनहिताच्या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, त्यास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंकर साळवे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार ग्रंथपाल गंगाधर जगतकर यांनी मानले.





# महागाव पोलिसांचा विद्यार्थी सुरक्षा व पोलीस भरती मार्गदर्शनाचा दुहेरी उपक्रम

**महागाव | प्रतिनिधी**

महागाव पोलीस स्टेशनच्या वतीने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसह युवकांना पोलीस भरतीबाबत मार्गदर्शन करण्यासाठी दोन महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय वाहनचालकांची सभा घेण्यात आली, तर स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना पोलीस भरतीविषयी मार्गदर्शन करण्यात आले. दुपारी १२ वाजता महागाव पोलीस स्टेशन येथे परिसरातील शासकीय व खासगी शाळांच्या वाहनचालकांची सभा आयोजित करण्यात आली. यावेळी पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहनचालकांना महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. वाहन चालविताना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे, वाहनाचा वेग मर्यादित ठेवणे, क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी वाहून न नेणे, वाहनांची नियमित तांत्रिक तपासणी करणे, वाहन चालविताना मोबाईल फोनचा वापर टाळणे तसेच वाहनाचे परवाना, विमा, पीयूसी आणि इतर आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यावेळी विद्यार्थ्यांच्या जीविताची सुरक्षितता ही सर्वोच्च जबाबदारी मानून प्रत्येक वाहनचालकाने जबाबदारीची जाणीव ठेवून वाहन चालवावे, असे आवाहनही त्यांनी केले. यानंतर दुपारी २ वाजता महागाव येथील स्टेट बँकेजवळील स्वामी विवेकानंद अभ्यासिकेला पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांनी भेट दिली. येथे पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या सुमारे ५० ते ६० विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला. भरती प्रक्रियेचे स्वरूप, लेखी परीक्षेची तयारी, शारीरिक चाचणीसाठी आवश्यक नियोजन, नियमित सराव आणि शिस्तबद्ध तयारी याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महागाव तहसीलचे कर्तव्यदक्ष तहसीलदार अभय मस्के होते. युवकांनी कोणत्याही अफवा किंवा गैरमार्गाचा अवलंब न करता स्वतःच्या गुणवत्तेच्या आणि मेहनतीच्या जोरावर भरतीची तयारी करावी, असे आवाहन करताना पोलीस भरती प्रक्रियेसंदर्भात कोणतीही अडचण अथवा शंका असल्यास थेट महागाव पोलीस स्टेशनशी संपर्क साधण्याचे आवाहन वानखडे यांनी विद्यार्थ्यांना केले. महागाव पोलिसांनी एकाच दिवशी विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीबाबत जनजागृती आणि पोलीस भरतीसाठी युवकांना प्रेरणा व मार्गदर्शन करण्याचा घेतलेला पुढाकार सर्व स्तरांतून स्वागतार्ह मानला जात आहे. स्वामी विवेकानंद अभ्यासिकेत स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्व प्रकारची पुस्तके मोफत पुरवण्याची हमी यावेळी तहसीलदार मस्के यांनी दिली.

# महागांव पोलीसांची कौतुकास्पद कामगिरी 98,000/–रक्कम मुळमालकास केली परत



केंद्र सरकारतर्फे राबविण्यात येत असलेल्या राष्ट्रिय सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टल पोलीस स्टेशन महागांव येथे तक्रारदार कैलास उकडंराव वानखेडे रा. वडद मुडणा यांचे 98,000/- रुपये त्यांचे खात्यातुन ऑनलाईन फसवणुक झाल्याने पोलीस स्टेशन महागांव येथे NCCR Portal Akn. no. 31906260120412 दाखल करून सायबर चक्रे फिरवुन तक्रारदार यांची ऑनलाईन फसवणुक झालेली 98,000/- रुपये कार्यकौशल्याने परत मिळवुन दिली.

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक कुमार चिंता IPS, उपविभागिय पोलीस अधिकारी अमर मोहिते सा. यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक सेवानंद वामनराव वानखडे सा., सायबर सेलच्या पोलीस निरिक्षक यशोधरा मुनेश्वर मॅडम यांचे संयुक्त मार्गदर्शनात पोलीस स्टेशन महागांव चे पोलीस अमलदार अमोल भगत व विरेंन चक्रनारायण यांनी केली. पोलीस अंमलदार यांना भेट देवुन विचारपुस केली असता त्यांनी सन 2026 मध्ये एकुण 98,000/- रुपये इतकी रक्कम मुळ मालकास परत केल्याचे सांगितले असुन एखाद्या नागरिकांची ऑनलाईन फसवणुक झाल्यास 1930 वर कॉल करावे अथवा जवळचे पोलीस स्टेशन (सायबर पोलीस) यांचेशी संपर्क करावा आणि जितके लवकर संपर्क कराल तितके लवकर आपली ऑनलाईन फसवणुक झालेली रक्कम होल्ड करण्यास मदत होईल अशा संदेश नागरिकांना दिला आहे.

सर्व शहरात कौतुकाची चर्चा सुरू असुन तक्रारदार यांनी पोलीसांचे आभार व्यक्त केले आहे.



# मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनांच्या कामाला धडाडी आणणार - मा. आ. प्रकाश पाटील देवसरकर

**महागाव | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेच्या अध्यक्षपदी मा. श्री. प्रकाशराव पाटील देवसरकर उमरखेड–महागाव विधानसभा मतदारसंघ यांची निवड करण्यात आली याची औचित्य साधून महागाव येथील विश्रामगृहावर जाहीर सत्कार करण्यात आला यावेळी बोलताना प्रकाश पाटील यांनी सांगितले की उमरखेड आणि महागाव मतदार संघातील पांदन रस्त्यांचा प्रश्न निकाली काढण्यासाठी खंबीरपणाची भूमिका घेऊन शेतकऱ्यांचे प्रश्न निकाली काढण्यासाठी तत्परतेने प्रश्न निकाली काढणार.

नितीन भुतडा यांची पश्चिम विदर्भ एस.आय. आर. प्रमुख पदी निवड झाल्याबद्दल यांच्या अभिनंदनार्थ सत्कार समारंभा मध्ये बोलताना त्यांनी सांगितले महसूल मंत्री बावनकुळे यांनी शेतकऱ्यांचे विविध प्रश्न मार्गी काढण्याचे जणू काही हत्यारच उपासले शेतकऱ्यांचे विज बिल प्रश्न, पांदन रस्त्यासाठी मुरूम च्या टक्टरला रॉयल्टी सुद्धा लागणार नाही तर महसूल विभागाला सुद्धा पकडता येणार नाही असे विविध प्रश्न निकाली होत असल्याचे पहावयास मिळत असल्याचे नितीन भाऊ भुतडा यांनी बोलताना सांगितले

तर यावेळी आमदार किसनराव वानखेडे यांनी सुद्धा उमरखेड महागाव विधानसभा विमातून शासन स्तरावर वगळला असल्याने कृषिमंत्र्यांच्या दालनात जाऊन आवाज उठविला व अधिकाऱ्यांना धारेवर धरल्याने हाही प्रश्न निकाली लागेल हे मात्र खरे.

यावेळी भारतीय जनता पार्टी महागाव तालुका अध्यक्ष श्रीधर भवनकर, गुलाबराव जाधव, अमोल चिकणे, रामराव नरवाडे,जगदीश नरवाडे,सुदाम खंदारे, विलास कव्हाने, विलास शेबे, सुनील टेमकर यांच्यासह पक्षांचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते यावेळी कार्यकर्त्यांना आव्हान करून आपापल्या विभागातील उर्वरित पांदण रस्त्यांचे प्रश्न समस्या निदर्शनास आणून देण्याचे आवाहन करण्यात आले जेणेकरून कोणताही शेतकरी पांदन रस्त्यापासून अलिप्त राहणार नाही व स्वावलंबी बनेल.



दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, रविवार, 19 जुलै 2026
Last page




# परळीत आज आ.धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली किरणकुमार गित्ते IAS यांचा भव्य नागरी व गौरव सत्कार

## सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे–प्रदीप खाडे


**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री प्रभू वैद्यनाथाच्या पावन नगरीतील बेलंबा गावचे सुपुत्र तथा त्रिपुरा केडरचे वरिष्ठ सनदी अधिकारी आयएएस किरणकुमार गित्ते यांची त्रिपुरा राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे सचिव (Secretary to the Chief Minister) म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा भव्य नागरी सत्कार व गौरव सोहळा आज आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे व सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे उपस्थित राहणार असून, नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव तथा कै. रामभाऊ (आण्णा) खाडे सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष प्रदीप खाडे यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. परळीकर नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर तसेच सर्व युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून परळीच्या सुपुत्राचा गौरव करावा, असे आवाहन प्रदीप खाडे यांनी केले आहे.

त्रिपुरा सरकारने नुकत्याच केलेल्या प्रशासकीय फेरबदलात किरणकुमार गित्ते यांच्यावर राज्यातील अत्यंत महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे. त्रिपुराच्या राज्यपालांच्या आदेशानुसार त्यांची मुख्यमंत्र्यांचे सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, सार्वजनिक बांधकाम (PWD),




आरोग्य व कुटुंब कल्याण, माहिती व संस्कृती (ICA), सुशासन विभाग तसेच उद्योग व वाणिज्य या महत्त्वाच्या खात्यांच्या सचिवपदाची धुरा त्यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. याशिवाय 'त्रिपुरा इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन' या संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) पदाचाही अतिरिक्त कार्यभार त्यांच्याकडे देण्यात आला आहे. आयएएस किरणकुमार गित्ते यांनी आपल्या उत्कृष्ट प्रशासकीय कार्यातून परळी व बीड जिल्ह्याचा देशपातळीवर नावलौकिक



वाढविला आहे. अत्यंत सर्वसामान्य कुटुंबातून पुढे येत त्यांनी जिद्द, चिकाटी, कठोर परिश्रम आणि अभ्यासाच्या बळावर भारतीय प्रशासकीय सेवेत मानाचे स्थान मिळविले. आज देशातील उल्लेखनीय सनदी अधिकाऱ्यांमध्ये त्यांची गणना होत असून, त्यांचे कार्य ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

आज, रविवार दि. १९ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता, शासकीय विशेष अतिथी विश्रामगृह, छत्रपती शिवाजी महाराज चौक, परळी वैजनाथ येथे हा भव्य नागरी सत्कार



व गौरव सोहळा संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे व सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे उपस्थित राहणार आहेत किरणकुमार गित्ते यांच्या या अभूतपूर्व यशाचा गौरव करणे ही प्रत्येक परळीकरासाठी अभिमानाची बाब असून, या ऐतिहासिक सोहळ्यास विविध क्षेत्रातील मान्यवर, लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, शिक्षक, वकील, डॉक्टर, व्यापारी, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी तसेच सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. तरी या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक प्रदीप खाडे यांनी केले आहे.

# ना. पंकजाताई मुंडे यांनी परळी मतदार संघातील मॅपिंगचा टक्का वाढवण्या करिता अधिकाऱ्यांना दिल्या सूचना



## आज दिवसभर मतदान केंद्रावर वर बसून BLO नागरिकांचे मॅपिंग करून घेणार - प्रा पवन मुंडे

**परळी | प्रतिनिधी**

पशुसंवर्धन तथा पर्यावरण कॅबिनेट मंत्री मा ना पंकजाताई मुंडे यांचे सूचनेनुसार परळी शहरातील स्थानिक प्रशासनाने मॅपिंग प्रक्रियेला गती येण्या साठी परळी शहरात आज दिवसभर सकाळी 10 ते सायंकाळी 06 या वेळेत सर्व बूथ केंद्रांवर ( जिथे आपण विधानसभा व लोकसभा इलेक्शन ला मतदान करतो) सरकारी BLO मॅपिंग करण्यासाठी साठी बसनार आहेत, मतदार संघात भाजपाचे BLA 2 सरकारी BLO ना प्रत्येक बूथ वर मदत करत असून परळी विधानसभा मतदार संघात मॅपिंग प्रक्रिया जोमात चालू आहे मात्र परळी शहरात मॅपिंग चा टक्का कमी आहे

तरी ज्या ठिकाणी आपल्या बूथ वरील मॅपिंग राहिलेल्या नागरिकांनी आपल्या बूथ वर जाऊन जाऊन तात्काळ मॅपिंग करून घ्यावे असे आवाहन भाजपा गटनेते ,परळी नगरपरिषदेचे बांधकाम सभापती तथा भाजपा BLA1 परळी विधानसभा प्रमुख प्रा पवन मुंडे यांनी केले आहे.



# जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात कु धनश्री जगताप कु अक्षरा मुंडे यांचा सत्कार संपन्न

परळी येथील जवाहरलाल नेहरू कला वाणिज्य विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय परळी वैजनाथ या महाविद्यालयाचे कर्मचारी श्री प्रल्हाद जगताप व श्री नरहरी मुंडे यांच्या कन्या त्यांनी नीट परीक्षेत घवघवीत यश संपादन केले कु धनश्री जगताप हिने नीट परीक्षेत 544 व कु अक्षरा मुंडे हिने 416 मार्क्स नीट परीक्षेत घेतले असून दोन्हीही मेडिकल प्रवेशास पात्र झाल्या आहेत त्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . बी. डी. मुंडे व कर्मचारी यांनी त्यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला पुढील शिक्षणास शुभेच्छा दिल्या यावेळी प्रा .सचिन डहाळे , प्रल्हाद जगताप ,नरहरी मुंडे , नागनाथ साबणे, रुक्षराज आंधळे शेख अब्दुल आदी कर्मचारी उपस्थित होते.

# डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी आयएमए आक्रमक ; २० जुलैला महाराष्ट्रात २४ तासांसाठी आरोग्यसेवा ठप्प

## इमर्जन्सी आपत्कालीन सेवा मात्र सुरु राहणार ; राज्य पदाधिकारी डॉ.राजेश इंगोले यांची माहिती

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

डोंबिवलीतील शास्त्रीनगर रूग्णालयात डॉक्टर आणि नर्सवर झालेल्या अमानुष हल्ल्याच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशनने राज्यव्यापी आंदोलन पुकारले आहे. आयएमए महाराष्ट्र शाखेने येत्या सोमवार, दिनांक २० जुलै सकाळी ६ ते मंगळवार २१ जुलै सकाळी ६ पर्यंत २४ तास सर्व नियमित आरोग्यसेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

या काळात सर्व ओपीडी बाह्यरूग्ण विभाग, नियोजित शस्त्रक्रिया आणि रूटीन तपासणी बंद राहील. मात्र गंभीर रूग्णांच्या जीवाशी धोका होऊ नये म्हणून आय.सी.



यु, आपत्कालीन विभाग, प्रसूती कक्ष आणि जीवनावश्यक उपचार सुरू ठेवण्यात येणार आहेत. या आंदोलनात अलोपॅथी, आयुर्वेद, होमिओपॅथी, डेंटल, यूनाणीसह सर्व वैद्यकीय शाखांचे डॉक्टर, परिचारिका, पॅरामेडिकल स्टाफ आणि आरोग्य संघटना एकत्र येणार आहेत.

महाराष्ट्र राज्य आयएमएने खालील प्रमुख मागण्या केलेल्या आहेत. त्या अशा : १) डोंबिवली हल्ल्यातील आरोपींना तात्काळ अटक आणि कठोर शिक्षा, २) डॉक्टर्स प्रोटेक्शन कायद्यात कडक तरतुदी आणि जलद अंमलबजावणी, ३) सर्व सरकारी आणि खाजगी रूग्णालयांमध्ये २५ ×७ सुरक्षा, सीसीटीव्ही प्रवेश नियंत्रण, ४) हल्ल्याच्या केसेससाठी फास्टट्रॅक कोर्ट, ५) आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र केंद्रीय कायदा आयएमए ने सरकारला इशारा दिला आहे की, ९ ऑगस्ट २०२६ पर्यंत ठोस निर्णय न झाल्यास राज्यभर बेमुदत संप आणि संपूर्ण वैद्यकीय सेवा बंद आंदोलन छेडण्यात येईल.

जगातला कोणताही वैद्यकीय व्यावसायिक सर्वप्रथम रूग्णहिताला प्राधान्य देतो आपल्याकडे येणाऱ्या रूग्णाचे प्राण कसे वाचतील याकरिता तो आपले सर्व कौशल्य पणाला लावून त्या रुग्णाचा जीव वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न करत असतो. परंतु, ही सेवा देत असताना जर त्याच्या स्वतःच्याच जीविताला धोका असेल आणि अशा भयावह दडपणाच्या वातावरणात तो रुग्णाचा इलाज चांगल्या पद्धतीने करू शकेल का हा सवाल इंडियन मेडिकल असोसिएशनचे सांस्कृतिक विभागाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी सरकारला केला आहे. हा संपाचा निर्णय रूग्णांविरोधी नाही. डॉक्टर सुरक्षित राहतील तरच रुग्णसेवा सुरक्षित राहील असे डॉ.राजेश इंगोले यांनी स्पष्ट केले आहे.

डोंबिवलीतील डॉक्टरांवरील हल्ल्याचा निषेध करण्यासाठी आयएमए ने २० जुलै रोजी सकाळी ६ ते २१ जुलै सकाळी ६ पर्यंत महाराष्ट्रातील सर्व नियमित आरोग्यसेवा बंद ठेवण्याची घोषणा केली आहे. फक्त इमर्जन्सी, अतिदक्षता विभाग आणि प्रसूती सेवा सुरू राहणार असल्याची माहिती इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांनी त्यांच्या अधिनिस्त सर्व शाखांना दिली आहे. या संपामुळे रूग्णांना होणाऱ्या त्रासाबद्दल इंडियन मेडिकल असोसिएशन दिलगीर आहे. परंतु, डॉक्टरांना काम करण्यासाठी मुक्त वातावरण मिळत नसल्याने तसेच छोट्या-मोठ्या गोष्टींवरून डॉक्टरांना, नर्सेसला, पॅरामेडिकल स्टाफला मारहाण होणे चुकीचे व गंभीर आहे त्यामुळे नाईलाजाने हा संप आम्हाला करावा लागत आहे असेही डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले.

या लाक्षणिक एक दिवसीय संपानंतरही जर सरकारने ९ ऑगस्टपर्यंत सकारात्मक निर्णय न घेतल्यास संपूर्ण महाराष्ट्रात बेमुदत संप पुकारला जाईल आणी सर्व खासगी तसेच सरकारी वैद्यकीय सेवा संप काळात बंद केल्या जातील त्यानंतर सर्व जबाबदारी सरकारवर राहील असा गंभीर इशारा इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांच्या तर्फे देण्यात आला आहे असे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक समिती अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी प्रसिद्धी माध्यमांना सांगितले.